

॥ श्री ॥

# श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था - सावरसई (पेण)

नोंदणी क्र.: सार्व. विश्वस्त व्यवस्था-एफ् ३३२१ (मुंबई) महाराष्ट्र राज्य १२६/१९७४



मौजे सावरसई, पेण-खोपोली रोड, पो.सावरसई, ता. पेण, जि. रायगड ४०२१०७.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (केवळ सभासदांसाठी)

श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था सावरसई (पेण) या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ६ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजता देवस्थानच्या सावरसई-पेण येथील ''भक्तनिवास'' येथे घेण्यांत येणार आहे.

**• सभेपुढील विषय आणि कामे •**

१) संस्थेच्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेसमोर वाचून त्यास मान्यता देणे.

२) संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२० आणि दिनांक ३१ मार्च २०२१ अखेरच्या ताळेबंद आणि जमाखर्च पत्रके, आर्थिक पत्रके इत्यादींस मान्यता देणे.

३) श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था सावरसई (पेण) या संस्थेची घटना नियम-नियमावली कालबाह्य झाल्यामुळे त्यामध्ये बदल करणे आवश्यक असल्याने संस्थेच्या मे. विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने प्रारुप स्वरुपात सादर केलेल्या घटना नियम-नियमावली मसुद्यास अंतिम मान्यता देणे (सोबत मसुदा जोडलेला आहे.)

४. श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था सावरसई (पेण) या संस्थेच्या प्रारुप स्वरुपातील घटना, नियम-नियमावली मसुद्यामधील तरतुदी प्रमाणे आणि त्या संदर्भातील अटी शर्थीनुसार संस्थेच्या मे. विश्वस्त आणि कार्यकारी मंडळ यांची पाचवर्षाकरीता म्हणजेच सन २०२० ते सन २०२७ या कालावधीकरिता संस्थेच्या सभासदांतून निवड करणे.

५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेसमोर येणाऱ्या आयत्या वेळेचे कामकाजांचा विचार करणे.

कृपया सर्व सभासदांनी सभेसाठी वेळेवर उपस्थित रहावे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजामध्ये सहभाग घ्यावा ही नम्र विनंती.

श्री बापुजीबुवा देवस्थान संस्था-सावरसई (पेण) करिता

मे.विश्वस्त आणि कार्यकारी मंडळ यांचे परवानगीने आणि निर्देशानुसार

ठिकाण : सावरसई (पेण)

गुरुवार दिनांक २० जानेवारी २०२२

(प्रदीपचंद्र विनायक श्रृंगारपुरे)

(प्रमुख कार्यवाह)

---

## महत्वाच्या सुचना

१. शासनाच्या कोरोना-ओमिक्रॉन संदर्भातील मार्गदर्शक सुचना आणि नियम यांस अनुसरुन सभेकरीता उपस्थित राहणाऱ्या सर्व मान्यवर सभासदांनी मास्क घालुन सभेसाठी उपस्थित रहाणे गरजेचे आहे.

२. सभेच्या कामकाजासाठी सोशल डिस्टसिंगचे पालन करुनच बसावे लागेल.

३. रविवार दिनांक ०६ फेब्रुवारी २०२२ रोजी बोलावण्यात आलेल्या सभेसाठी कमीत कमी २५ सभासदांची गणसंख्या/उपस्थिती अत्यावश्यक राहील. मात्र गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब अथवा सभा स्थगित करण्यांत आल्यास सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच जागी, त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. अश्या घेण्यांत येणाऱ्या सभेसाठी गणसंख्येची (कोरमची) आवश्यकता अथवा अट असणार नाही.

४. वरील प्रमाणे सभेपुढील विषय आणि कामे-क्रमांक ०३ आणि ०४ करिता संस्थेच्या मे. विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने प्रारुप स्वरुपात तयार केलेल्या घटना, नियम-नियमावली मसुदा प्रत आणि सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयामध्ये असणाऱ्या नोटीस बोर्डावर (सूचना फलक) प्रसिद्ध करणेंत आल्या आहेत. संस्थेच्या नविन प्रारुप स्वरुपातील घटना, नियम-नियमावली मसुदा नोटीस सोबत पाठविला आहे. सभासदांची यादी आणि घटना, नियम-नियमावली मसुदा यांच्या प्रति संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. त्यांच्या प्रती कोणा सभासदांस हव्या असल्यास त्या सशुल्क उपलब्ध करुन दिल्या जातील.
   - सभासद यादी किंमत रुपये १५०/- (१ प्रती यादी),
   - प्रारुप स्वरुपातील घटना, नियम-नियमावली मसुदा यादी किंमत रुपये १००/- (१ प्रतिसाठी)

५. मान्यवर सभासदांस सभेच्या कामकाजामध्ये काही प्रश्न विचारावयाचे असल्यास किंवा काही सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात सभेच्या तारखेच्या सहा दिवस अगोदर म्हणजेच सोमवार दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत संस्थेच्या कार्यलयात मिळतील अश्याबेताने पाठवाव्यात.